आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI No. MAHBIL/2011/39044

वर्ष १४ । अंक २ । मे २०२५ । मूल्य रु. ५/-

# Grahak Tituka Melwawa
# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत
ग्राहक हिताय ग्राहक सुखाय

मुंबई ग्राहक पंचायत
MGP 50 सुवर्ण महोत्सवी वर्ष २०२४-२०२५

MEMBER OF CONSUMERS INTERNATIONAL

जागो ग्राहक जागो



# शिरीष देशपांडे यांची उच्च न्यायालयाने गठीत समितीवर नेमणूक



"हवाई प्रवाशांना मूलभूत सुविधा पुरवून देशातील विमानतळांनी आदर्श निर्माण करायला हवा. विमानतळांवर व्हीलचेअर अभावी प्रवाशांची अजिबात गैरसोय होता कामा नये, आवश्यक तेव्हा व्हिलचेअर मिळणे हा संबंधित ग्राहकांचा हक्कच आहे आणि ती स्वतःहून पुरवणे हे Director General of Civil Aviation (डीजीसीए) तसेच संबंधित विमान कंपन्यांचेही कर्तव्य आहे. याविषयी विमानतळांचे व्यवस्थापन करणारी प्रशासने आणि सर्व विमान कंपन्यांनी संवेदनशील असायलाच हवे", अशी टिपणी करत मुंबई उच्च न्यायालयाने आज दोन याचिकांवर सुनावणी दरम्यान तीन तज्ज्ञांची एक समिती गठीत केली आहे. या समितीने सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून देशातील विमानतळांवरील प्रवाशांसाठी असलेल्या सुविधांबाबत सरकारला शिफारसी करणे अपेक्षित आहे. ही समिती ही आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री. रघुराम यांच्या अध्यक्षतेखाली काम करेल. ग्राहक प्रतिनिधी म्हणून मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांची नेमणूक करण्यात आली आहे.

ॲड. शिरीष देशपांडे यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा.

अनिता खानोलकर, कार्यवाह

## मुंबई ग्राहक पंचायतीच्या वर्षभरातील सर्व पंचायत पेठा यशस्वी झाल्यानंतर सर्व गाळेधारक आणि कार्यकर्ते यांच्यासाठी आयोजित स्नेहसंमेलनाची काही क्षणचित्रे...



RNI No. MAHBIL/2011/39044

**मुंबई ग्राहक पंचायत**

**विश्वस्त मंडळ**
डॉ. बाळ फोंडके
अनुराधा गोरे
ललिता कुलकर्णी
अनुराधा नरसाळे
संजीव मंत्री

**अध्यक्ष**
डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**
अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**
ॲड. शिरीष देशपांडे (कार्याध्यक्ष, स्वीकृत)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह, स्वीकृत)
ज्योती मोडक (कार्यवाह)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**कार्यकारिणी सभासद**
शीला देवळेकर
राजेंद्र राणे
शुभदा चौकर
अनघा आचरेकर
मंगला गाडगीळ
शर्मिला रानडे
आलोक हर्डीकर
विवेक केळकर
प्रकाश पाटील
उदय पिंगळे (स्वीकृत)
नेहा जोशी
कल्पिता रानडे
विनायक सोमण (स्वीकृत)
सुधीर तावरे

**निमंत्रित**
संघटन विभाग प्रमुख

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.

# ग्राहक तितुका मेळवावा

मे २०२५ | वैशाख - ज्येष्ठ १९४७

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ०४
'सेतूबंधने जोडून ओढा...'

**"संस्थाबांधणीचे उत्तम प्रारूप" - डॉ. विनय सहस्रबुद्धे यांचे प्रशंसोद्गार** ०५

**रेस्टॉरंट्समधील सक्तीचे सेवाशुल्क आपला लढा यशस्वी** ०७

**कार्यकर्ते, गाळेधारक स्नेहसंमेलन - एक आनंद सोहळा** ०८

**'बँक ठेवींना विमा सुरक्षा' मागणीला सार्वत्रिक पाठिंबा** १०

**'बँकिंग'बद्दल बोलूया** ११
ऑनलाईन पेमेंटची मर्यादा निश्चित करा!

**वाचू आनंदे** १२
भन्नाट शोध

**वार्षिक मेळावे उत्साहात संपन्न** १३

**चाणाक्ष ग्राहक** २०
लॉलिपॉपची गोष्ट

**Massive Haul of Fake Paneer** २१

**Is Your Watermelon Safe?** २२

**संपादक** शुभदा चौकर
**संपादकीय साहाय्य** नेहा जोशी, सुमिता चितळे, अंजली पोतदार
**सल्लागार** ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
**मुखपृष्ठ** राजेंद्र राणे
**अक्षरजुळणी व कला दिग्दर्शन** रिद्धी नि. पाटील, तन्वी गोखले
**मुद्रण** इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat**, Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai – 400 056. Ph.: 022-4750 8541/42 (Office).
• Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in
• Website : **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

संपादकीय

# ‘सेतूबंधने जोडून ओढा...’

आपल्या संस्थेचा ५० वा वाढदिवस आपण तिथीने गुढीपाडव्याला आणि तारखेने १२ एप्रिलला दिमाखात साजरा केला. पार्ल्याच्या दीनानाथ नाट्यगृहात एका हृद्य कार्यक्रमात आपला सुवर्णमहोत्सव साजरा झाला. त्याचा थोडक्यात वृत्तांत या अंकात आहेच.

१९७५ साली अन्नधान्य, कपडे या जीवनावश्यक गोष्टींची महागाई, चणचण यांतून ग्राहक या वर्गाला एकत्र करण्याचा ध्यास आपल्या ध्यासपंथी त्रिमूर्तीने धरला आणि त्यातून आपली संस्था निर्माण झाली.

तेव्हापासून आजपर्यंत आपल्या संस्थेची कारकीर्द देदीप्यमान आहे. विनामोबदला, समरसून काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांच्या बळावर ही संस्था मोठी झाली, होत आहे. १९७५ ते १९९७ अशी सुमारे २२ वर्षे सलग मधुकर मंत्री यांनी संस्थेच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पेलल्या. ॲड. शिरीष देशपांडे गेली ४० वर्षे मौलिक योगदान देत आहेत. अशोक रावत, कमळाकर पेंडसे सर, ललिताताई कुलकर्णी यांसह अनेक जणांनी त्यांची बरीच वर्षे या संस्थेला दिली. आजचे संस्थेचे व्यापक रूप हे अशा निरलस कार्यकर्त्यांमुळे आणि वर्षानुवर्षे आपल्या संस्थेशी इमानी राहिलेल्या हजारो सभासदांमुळे आहे.

सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. विनय सहस्रबुद्धे हे राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील विचारवंत. तेही आपले सभासद. ही संस्था म्हणजे लोकतांत्रिकीकरणाचे व संस्थाबांधणीचे उत्तम उदाहरण आहे, असे कौतुक त्यांनी केले. पन्नाशीपुढे काय, नवीन आव्हानांना संस्थेने कसे भिडावे, यासाठी डॉ. सहस्रबुद्धे यांनी मौलिक सूचना केल्या. अलीकडे आपण अनुभवतो की प्रसारमाध्यमे निखळ बातम्या देत नाहीत. ते न्यूज मध्ये व्ह्यूज घालून भेसळ करतात. मीडियाचा ग्राहक म्हणून निर्भेळ बातमीचा आग्रह धरणे, त्यासाठी संकेत केले जाणे, हे मोठे आव्हान ग्राहक पंचायतीने स्वीकारावे. तरुणांना आकर्षित करून त्यांना सुजाण ग्राहक घडवण्यासाठी ‘कंझ्युमर जस्टिस’ या विषयावर काही पाठ्यक्रम तयार करून तो शिक्षणक्रमात देऊ करणे, हे काम पंचायत करू शकते, हेही त्यांनी सुचवले.

चांगली पुस्तके, सिनेमे, नाटके यांची ग्राहकांच्या दृष्टीकोनातून क्रमवारी लावणे, अभिरुचीपूर्ण प्रेक्षक निर्माण करणे हेही आवश्यक आहे. त्यासाठी प्रेक्षकांना आणि वाचकांना अनुदान मिळावे, यासाठी संस्थेने सरकारकडे आग्रह धरावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

स्मार्टफोनच्या रूपात ऑनलाईन राक्षस घराघरात शिरलेला आहे. सामाजिक स्वास्थ्यासाठी त्याच्या वापरावर बंधने आणता येतील का, कमीतकमी १६ वर्षांपर्यंत ते ‘लायसेन्सड गॅजेट’ असावे आणि पालकांच्या देखरेखीखाली पाल्यांना मिळावे, याचा संस्थेने जरूर अभ्यास करावा, असेही डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी सांगितले.

...या पुढच्या हाका आहेत! ५० वर्षांपूर्वी ग्राहकांपुढे चणचण हे आव्हान होते, आज चंगळ हे आव्हान आहे. तेव्हा अभावग्रस्ती होती, आज ‘Problem of Plenty’ आहे. ग्राहकांना गृहीत धरणे, त्यांच्यावर अन्याय, हे प्रश्न सुटलेले नाहीत. आपल्या संस्थेच्या आजपर्यंत केलेल्या कामाचा सुवर्ण-झळाळ इतका आहे की आपल्याकडून समाजाच्या वाढत्या अपेक्षा आहेत. त्या अपेक्षा पूर्ण करायच्या तर आपले संघटन अधिक विस्तृत, जास्त मजबूत करावे लागणार. स्वयंसेवी, स्वयंस्फूर्त कार्यकर्त्यांची फौज कित्येक पट असावी लागणार.

बाबूजींच्या स्वरांतील ‘सेतू बांधा रे’ गाण्यांत एक ओळ आहे, ‘सेतूबंधने जोडून ओढा समीप लंकापुरी...’ अनेक तनामनांचे आणि कामांचे सेतू जोडत काम पुढे नेण्याचे मोठे आव्हान आपल्या संस्थेसमोर आहे!

**- शुभदा चौकर**

# “संस्थाबांधणीचे उत्तम प्रारूप” - डॉ. विनय सहस्रबुद्धे यांचे प्रशंसोद्गार

**- अॅड. शिरीष वा. देशपांडे, कार्याध्यक्ष**

“व्यापक पसरलेल्या ग्राहकांचे संघटन करून त्यांचे संरक्षण करणे हे मुळातच कठीण काम. ते काम बिंदुमाधव जोशी, मधुकर मंत्री आणि सुधीर फडके (बाबूजी) यांनी १९७५ मधे मुंबईत गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सेवाभावी वृत्तीने सुरू केले. ग्राहक संघांद्वारे ग्राहकांना संघटीत करत त्यांना दरमहा दर्जेदार वाणसामान रास्त दरामध्ये 'ना नफा, ना तोटा' तत्त्वावर देत मुंबई ग्राहक पंचायतीने ही चळवळ गेल्या पन्नास वर्षात मुंबई, ठाणे, पालघर, वसई रायगड, पुणे येथे विस्तारीत केली. एखादे काम सुरू करणे सोपे असते पण ते टिकवणे महाकठीण असते. हे कठीण काम मुंबई ग्राहक पंचायतीने ५० वर्षे टिकवूनच ठेवले नाही तर बहुअंगांनी विस्तारीत केले त्याचे विशेष कौतुक. लोकतांत्रिकीकरणाचे हे एक उत्तम उदाहरण असून संस्था बांधणी कशी असावी याचे अभ्यास करण्याजोगे हे उत्तम उदाहरण आहे”, असे प्रशंसोद्गार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी मुंबई ग्राहक पंचायतीच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्यात व्यक्त केले. संस्थेच्या कामातील महिलांच्या दमदार सहभागाचेही त्यांनी कौतुक केले.

१२ एप्रिल १९७५ साली गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मुंबई ग्राहक पंचायतीच्या कार्याला आरंभ झाला. या घटनेला शनिवार, १२ एप्रिलला ५० वर्षे पूर्ण झाली, या निमित्ताने विलेपार्ले येथील दीनानाथ नाट्यगृहात एक दिमाखदार सोहळा संपन्न झाला. त्या प्रसंगी माजी खासदार आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी या प्रसंगी काही मौलिक सूचनाही केल्या. ते म्हणाले की, उपभोक्तावाद / कंझ्युमरिझम ऐवजी कंझ्युमर जस्टीस याचा विचार झाला पाहिजे. ग्राहक पंचायतीने बदलत्या काळानुसार आता आपल्या कक्षा रुंदावायला हव्यात असे सुचववून त्यांनी त्याची काही उदाहरणेही श्रोत्यांपुढे मांडली.

सुरुवातीला संस्थेचे कार्याध्यक्ष अॅड. शिरीष देशपांडे यांनी गेल्या ५० वर्षांत संस्था बहु आयामी कामांनी कशी बहरत गेली याचा धावता आढावा उपस्थित ९०० कार्यकर्त्यांपुढे मांडला. पन्नास वर्षांच्या काळातील स्थित्यंतरे, आव्हाने यांना सामोरे जात पन्नास वर्षांचा टप्पा पार करणे हे अचंबित करणारे असल्याचे सांगून हे सर्व संस्थेची त्रिमूर्ती बिंदुमाधव जोशी, मधुकर मंत्री आणि बाबूजी यांच्यामुळे शक्य झाले असे सांगत देशपांडे यांनी या त्रिमूर्तीला विनम्र अभिवादन केले.

नंतरची त्रिमूर्ती ललिताताई कुलकर्णी, अशोक रावत आणि कमळाकर पेंडसे यांना तसेच सर्व वितरण केंद्रे, भौगोलिक




**सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात ललिताताई कुलकर्णी, अनुराधा गोरे, अॅड. शिरीष देशपांडे, डॉ. विनय सहस्रबुद्धे , अशोक रावत, संजीव मंत्री**




**सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात उपस्थित कार्यकर्ते**

विभाग यातील कार्यकर्ते तसेच सर्व साधारण सदस्य या सर्वांप्रती देशपांडे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. १९७५ साली स्थापन झालेल्या ३० संघांपैकी १४ संघ आजही चालू आहेत, याचा देशपांडे यांनी आवर्जून उल्लेख केला. एक बटन दाबल्यावर हवी ती वस्तू घरात मिळत असताना आजही हे संघ संस्थेशी कसे जोडलेले आहेत, हा अभ्यास आणि संशोधनाचा विषय असल्याचे देशपांडे यांनी याप्रसंगी सांगितले.

प्रत्येक संघप्रमुख आणि सभासद हे जणु कस्तुरीमृगच आहेत, असं सांगत देशपांडे म्हणाले की, त्यांनाच माहित नसते की ते करत असलेले काम किती मोठे आहे. या सर्व सदस्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या स्वयंसेवी योगदानामुळेच मुंबई ग्राहक पंचायत आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर झाली आहे. त्यातूनच संस्थेने अनेक मोहीमा, ग्राहक हितासाठी केलेले कोर्टातील दावे यशस्वी करून दाखवले आणि जागतिक स्तरावर थेट संयुक्त राष्ट्रात संस्थेचा अमीट ठसा उमटवला आहे.

कार्यक्रमाचा समारोप करताना संस्थेचे विश्वस्त संजीव मंत्री यांनी सांगितले की, आजच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सांगता म्हणजे पुढील पन्नाशीची सुरुवात आहे. गेल्या ५० वर्षात उत्तम कार्य झाले. स्वदेशीचा पुरस्कार करत ५० वर्ष संस्था चालवणे, नवीन उद्योजकांकडून दर्जेदार उत्पादने त्यांच्या करवून घेणे हे फार महत्त्वाचे होते. मुंबई ग्राहक पंचायतीने ते करून दाखवले असे गौरवोद्गार संजीव मंत्री यांनी याप्रसंगी काढले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभदा चौकर यांनी केले.




सुरेल सांगितिक मेजवानी




डॉ. विनय सहस्रबुद्धे भाषण करताना

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात 'आकाशी झेप घे रे' हा बाबूजींच्या गाण्यावर आधारित सुरेल कार्यक्रम अजित परब, सोनाली कर्णिक, ऋषिकेश रानडे आणि प्राजक्ता रानडे यांनी सादर केला. कार्यक्रमाचे संयोजक होते मंदार कर्णिक.

या सोहळ्यात काही सुवर्ण महोत्सवी पुरस्कार प्रमुख पाहुणे विनयजींच्या हस्ते दिले गेले.

कृतज्ञता पुरस्कार

- ललिता कुलकर्णी (विश्वस्त आणि ज्येष्ठ मार्गदर्शक)
- अशोक रावत (संस्थापक सदस्य आणि ज्येष्ठ मार्गदर्शक)
- कमळाकर पेंडसे (ज्येष्ठ मार्गदर्शक)

तसेच काही सद्य कार्यकर्त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

- उत्तम वितरण केंद्र संचालक - श्री. प्रभाकर गवाणे (ठाणे)
- उत्तम भौगोलिक विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र राणे (बोरिवली)
- ग्राहक पंचायत पेठ - विशेष पुरस्कार - अनुराधा देशपांडे
- उत्तम आर्थिक नियोजन - विशेष पुरस्कार - रविंद्र सहस्रबुद्धे
- उत्तम स्तंभलेखन आणि ग्राहक प्रबोधन - शर्मिला रानडे




कार्यक्रमाचे अध्यक्ष संजीव मंत्री यांचे मनोगत

# रेस्टॉरंट्समधील सक्तीचे सेवाशुल्क आपला लढा यशस्वी

**- ॲड. शिरीष वा. देशपांडे, कार्याध्यक्ष**

दिल्ली उच्च न्यायालयाने २८ मार्च रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार, सेवा शुल्क किंवा टिप ही ग्राहकाने स्वेच्छेने द्यायची रक्कम आहे आणि ती सक्तीची अथवा बंधनकारक असू शकत नाही. रेस्टॉरंट व्यावसायिकांकडून सक्तीने आणि जबरदस्तीने ग्राहकांकडून सेवा शुल्क वसूल करणे हे ग्राहकांच्या हिताच्या विरोधात असून ग्राहकांच्या हक्कांचे उल्लंघन करणारे आहे, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशन्सनी दाखल केलेल्या दोन याचिका फेटाळून लावताना, दिल्ली उच्च न्यायालयाने सक्तीने सेवा शुल्क वसूल करणे हे ग्राहक संरक्षण अधिनियम २०१९ अंतर्गत 'अनुचित व्यापारी पध्दत' असल्याचे स्पष्ट केले आहे. ग्राहकाने मेनू कार्डवर सेवा शुल्काचा उल्लेख पाहून सेवा स्वीकारली असल्यामुळे तो करार स्वेच्छेने स्वीकारलेला आहे आणि त्यामुळे सेवा शुल्क सक्तीने आकारले जाऊ शकते, असा हॉटेल व्यावसायिकांचा दावा न्यायालयाने फेटाळला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की असा एकतर्फी करार हा अन्यायकारक करार ठरतो आणि ग्राहक संरक्षण अधिनियमाच्या विरोधात जातो.

हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशन्सनी केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने ४ जुलै २०२२ रोजी जारी केलेल्या याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना न्यायालयात आव्हान दिले होते. या मार्गदर्शक सूचनांनुसार, ग्राहकाच्या इच्छेविरुध्द सेवा शुल्क आकारणे प्रतिबंधित करण्यात आले होते. उच्च न्यायालयाने या दोन्ही याचिका फेटाळल्या असून, याचिकाकर्त्यांवर प्रत्येकी १ लाख रुपयांचा दंड लावला आहे, जो केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाकडे जमा केला जाईल आणि ग्राहक कल्याणासाठी वापरण्यात येईल.

मुंबई ग्राहक पंचायतीने २०१७ पासून हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये सक्तीच्या सेवा शुल्काविरोधात लढा उभारला होता. जानेवारी



| | | |
|---|---|---|
| PARATHA | 3 | 240.00 |
| GARLIC NAAN | 1 | 90.00 |
| ROTI | 3 | 210.00 |
| Total Qty: | 12 | |
| Sub Total: | | 2805.00 |
| S Charge | | 280.50 |
| GST@5% | | 154.28 |
| CGST @2.5 | 77.14 | |
| SGST @2.5 | 77.14 | |

२०१७ मध्ये आपण आपल्या संस्थेतर्फे संपूर्ण देशातील ग्राहकांचे ऑनलाइन सर्वेक्षण हाती घेतले, ज्यामध्ये मोठ्या संख्येने ग्राहकांनी सक्तीच्या सेवा शुल्काला विरोध दर्शवला होता. आपण शेकडो हॉटेल बिलांचे पुरावे गोळा करून ग्राहक व्यवहार विभागाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर, ग्राहक व्यवहार विभागाने हॉटेल उद्योग प्रतिनिधी आणि ग्राहक पंचायती बरोबर अनेक बैठकांत साधक-बाधक चर्चा केली. ४ जुलै २०२२ रोजी केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणाने मार्गदर्शक सूचना जारी करून अशा रेस्टॉरंट मधील सक्तीच्या सेवाशुल्क वसुलीवर बंदी आणली. त्याविरोधात हॉटेल आणि रेस्टॉरंट असोसिएशन्सनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, जी आता फेटाळण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाने हेही निर्देश दिले आहेत की, सर्व रेस्टॉरंट्सनी ४ जुलै २०२२ च्या या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे. जर कोणत्याही हॉटेल किंवा रेस्टॉरंटने या निर्देशांचे उल्लंघन केले तर ग्राहक संरक्षण प्राधिकरण ग्राहक कायद्यानुसार त्यांच्यावर कारवाई करेल. या न्यायालयीन निकालाचे स्वागत!

हॉटेल किंवा रेस्टॉरंटने ग्राहकांच्या इच्छेविरुध्द असे सेवा शुल्क सक्तीने वसूल केले तर संबंधित ग्राहकांनी 1915 या राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन क्रमांकावर किंवा National Consumer Help-line या वेबसाईटवर तक्रार नोंदवावी.

# कार्यकर्ते, गाळेधारक स्नेहसंमेलन - एक आनंद सोहळा!

- नेहा जोशी

दारी घातलेल्या रांगोळ्या, मंगल सनईचे सूर, चाफ्याचा दरवळणारा मंद सुवास, जरीकाठाच्या साड्यांमध्ये वावरणाऱ्या कार्यकर्त्यांची लगबग अशा उत्साही वातावरणात सनईच्या सुरात मुंबई ग्राहक पंचायत पेठांचे गाळेधारक आणि कार्यकर्ते यांचे स्नेहसंमेलन अंधेरी येथील सिंफनी बँक्वेट येथे शनिवार, २२ मार्च रोजी संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पितांबरी प्रॉडक्ट्सचे सर्वेसर्वा रविंद्र प्रभुदेसाई यांना निमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि श्री गणरायाला वंदन करून कार्यक्रमाचा श्रीगणेशा झाला.

पंचायत पेठ अध्यक्षा अनुराधा देशपांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गेल्या आर्थिक वर्षातील (२०२४-२०२५) विविध ठिकाणी झालेल्या पेठांचा आढावा घेतला. २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकंदर ११ ठिकाणी (मुंबई आणि मुंबईबाहेर) ग्राहक पंचायत पेठांचे आयोजन करण्यात आले. तसेच वंचित समाजातील वर्गासाठी 'सेतू बांधा रे!' या विशेष पेठेचेही आयोजन केले गेले. या सर्व पेठांची एकूण उलाढाल जवळजवळ १७ कोटी झाली. या पंचायत पेठांच्या यशस्वी सांगतेनंतर पंचायत पेठ समिती थोडी विसावते. वर्षभरात घडलेल्या घटनांचा आढावा त्यातून आलेल्या सूचना आणि पुढील वर्षासाठी अजून काही नवीन काय देता येईल यासाठी या स्नेहसंमेलनाचे आयोजन केले जाते. पंचायत पेठांचे हे स्नेहसंमेलन म्हणजे संस्थेच्या या विस्तारीत परिवाराचा आनंद सोहळा असतो. या पंचायत पेठांच्या कालावधीत अनेक सदस्य नव्याने जोडले जातात, त्यांची ओळख होते. आणि पुढील वर्षासाठी संस्थेला नवीन कार्यकर्ते मिळतात.

२०२४-२५ हे वर्ष संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष होते. या आनंददायी वर्षात पंचायत पेठांमध्ये नवनवीन उपक्रम आयोजित करायचे ठरले होते. २०२४ या वर्षातील पहिली पेठ गोरेगाव येथे संपन्न झाली. एप्रिल २०२४ मध्ये सुरू झालेल्या गोरेगावपासूनच्या पंचायत पेठेपासून अनेकविध उपक्रम दादर, अंधेरी, बोरीवली, वसई, ठाणे, चेंबूर, पुणे, पालघर येथील पंचायत पेठांमध्ये आयोजित केले गेले. अनेक नवीन कार्यकर्ते या उपक्रमांमुळे संस्थेला मिळाले. तसेच अनेक नवीन उद्योजक या पंचायत पेठांमध्ये सहभागी झाले. विविध भौगोलिक विभागातील कार्यकर्ते या पंचायत पेठांसाठी कार्यरत असतात. या सगळ्यांच्या सहभागानेच या पेठा यशस्वी होतात. त्यामुळे या संपूर्ण आर्थिक वर्षात साथ दिलेल्या सर्व गाळेधारकांना आणि कार्यकर्त्यांना अनुराधा देशपांडे यांनी धन्यवाद दिले.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी रविंद्र प्रभुदेसाई यांनी उपस्थितांना संबोधित केले. उद्योग जगतातील आणि उत्पादन क्षेत्रातील आपला झालेला प्रवास, त्यात आलेले अनुभव त्यांनी मोकळेपणाने, नर्म विनोद करत श्रोत्यांपुढे उलगडले. "कुठलीही गृहिणी उत्तम व्यवसाय करू शकते कारण ती लक्ष्मी असते. तेव्हा समोर बसलेल्या सर्व महिला उद्योजिकांना माझा नमस्कार! कोणताही व्यवसाय करताना 'तो माझा जन्मसिध्द अधिकार आहे आणि तो मी करणारच' अशी मानसिकता असावी. १९८६ साली त्यांनी जेव्हा उद्योग सुरू केला तेव्हा असे म्हटले गेले की तांबे-पितळ्याचा जमाना गेला, कोण घेणार पितांबरी? आता स्टीलचा जमाना आहे. पण मी घड्याळ्याचे काटे उलटे फिरवयाचे ठरवले! उद्योग करतांना त्यामागे ठाम उद्देश असावा, त्यामागील शास्त्र, तंत्र, सांखिकी, मार्केटिंग, जाहिरात, तंत्रज्ञान आपल्याला पक्के ठाऊक असायला हवे." पुढे त्यांनी 'लघु उद्योगमधील लघु हा शब्दच काढून टाकायला हवा' असा मोलाचा सल्ला दिला. हे सांगतांना वजाबाकीचे चिन्ह एक उभी रेष वाढवून अधिक होते. तेच जर फिरवले तर त्याचा गुणाकार होतो. गुणाकार म्हणजे वाढ! असे एक एक करत आपण आपली उत्पादने वाढवू शकतो. या देखण्या सोहळ्याला बोलविल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून संबोधित केले. रविंद्र प्रभुदेसाई यांना मध्यंतरी टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे D. Litt देऊन गौरविण्यात आले. त्याबद्दल कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी श्री. रविंद्र प्रभुदेसाई यांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, "मुंबई ग्राहक पंचायत पेठांमध्ये कौटुंबिक वातावरण असते. पेठांचे यश आम्ही दरवर्षी अशा मंगलमय वातावरणात साजरे करतो. मुंबई ग्राहक पंचायत कायमच उचित व्यवहाराचा मापदंड तयार करत आली आहे. आमचे संस्थापक सदस्य मा. बिंदुमाधव जोशी, मा. मधुकरराव मंत्री आणि स्वरगंधर्व सुधीर फडके अर्थात बाबूजी या त्रिमूर्तींनी घालून दिलेले आदर्श पाळत आहोत. त्यावेळी सुरू केलेली अभिनव अशी वितरण व्यवस्था आजही अविरत चालू आहे. गेली ४६ वर्षे पंचायत पेठा उचित व्यवहारांचे उत्तम प्रारूप समाजात रुजवत आहेत. ग्राहक चळवळ म्हणजे जबाबदारीचे भान, ग्राहकांची फसवणूक होता कामा नये, पावती दिली पाहिजे, रिफंड किंवा वस्तू बदलून दिली पाहिजे, हा आमचा आग्रह असतो." पुढे रविंद्रजींना उद्देशून कार्याध्यक्षांनी आपले विचार व्यक्त केले- "आपला लघु हा शब्दच आपल्या शब्दकोशातून काढून टाकणे हा विचार मला खूप भावला. Always think big. स्वप्न बघून ती अंमलात आणली तरच उद्योजक मोठा होतो. दर्जाशी आणि तत्वाशी तडजोड नाही. हे आजवर संस्थेनी जिवापाड जपले आहे. Quality of service महत्त्वाची असते. ग्राहकांप्रती सौजन्य दाखवणे आवश्यक असते. आम्ही काही बाबतीत आग्रही आहोत निष्ठूर नाही. ही संस्था ५० वर्षे नुसती टिकली नाही तर बहरली. ग्राहक पंचायत 2012 पासून United Nationsच्या वार्षिक परिषदेत आपला ठसा उमटवत आहे. ग्राहक संस्था आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण कशा होतील याकरिता यंदा United Nations च्या जागतिक परिषदेत सादरीकरण करण्याची संस्थेला संधी मिळाली. ग्राहक पंचायत पेठांमधून मिळणारे उत्पन्न संस्थेचा जवळजवळ २५ टक्के आर्थिक भार उचलते. त्यामुळे आजपर्यंत कोणतेही सरकारी अनुदान न घेता आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असणारी मुंबई ग्राहक पंचायत ही जागतिक स्तरावर कुतूहलाचा विषय आहे. या विषयावर UNCTAD (अंक्टाड)च्या परिषदेमध्ये पंचायतीचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे, पंचायत पेठ समिती अध्यक्षा अनुराधा देशपांडे आणि ॲड. पूजा जोशी-देशपांडे यांनी सादरीकरण केले. United Nations Conference on Trade and Development च्या वेबसाईटवर हे पंचायत पेठांचे मॉडेल आज कायमस्वरूपी विराजमान झाले आहे. त्याचा सार्थ अभिमान संस्थेच्या प्रत्येक सदस्याला आहे. शाश्वत गोष्टी टिकतात," असे म्हणून देशपांडे सरांनी त्यांच्या भाषणाचा समारोप केला.

यानंतर नवीन गाळेधारक सोनल सावंत (सोलरॅप) आणि नम्रता पोरे (नवलाई क्रिएशन्स) यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. मुंबई ग्राहक पंचायत पेठेच्या परिवारात सामावून घेतल्याबद्दल त्यांनी आभार मानले. वर्षभर पेठांचे चोख आयोजन करणाऱ्या पेठ समिती सदस्यांचे अनघा आचरेकर, प्रिती कोळंबकर, उमा अभ्यंकर, उल्का पाटील, अलका मोकाशी, अनघा रेगे, जान्हवी नाडकर्णी आणि राजेंद्र राणे ह्यांचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन अनघा आचरेकर यांनी केले.

मुंबई ग्राहक पंचायतीचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने ग्राहक तितुका मेळवावा, मार्च-एप्रिल २०२५ हा विशेषांक म्हणून प्रकाशित करण्यात आला. या विशेषांकाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे रविंद्र प्रभुदेसाई, मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे, कार्योपाध्यक्ष प्रभाकर गवाणे, पंचायत पेठ समिती अध्यक्षा अनुराधा देशपांडे ह्यांच्या हस्ते करण्यात आले.




**श्री. प्रभुदेसाई यांच्या हस्ते आपल्या मासिकाच्या सुवर्णमहोत्सवी विशेषांकाचे प्रकाशन**

व या विशेषांकासाठी घेतलेल्या मेहनतीसाठी 'ग्राहक तितुका मेळवावा'च्या संपादक शुभदा चौकर यांचे भेटवस्तू देऊन कौतुक




**प्रमुख पाहुणे श्री. प्रभुदेसाई व कार्याध्यक्षांसह पंचायत पेठ समितीतील कार्यकर्ते**

करण्यात आले. शुभदा चौकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख श्रोत्यांना खुमासदार शैलीत करून दिली. सर्वजण आतुरतेने वाट पाहत असलेल्या सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम श्रीरंग भावे आणि केतकी भावे-जोशी यांनी सादर केला. सुसंवादिनी होत्या, योगिता प्रधान. आपल्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. सुधीर फडके यांच्या अजरामर अशा 'ज्योती कलश छलके' या गीताने सुरुवात झालेल्या सुरेल संगीत मैफलीची सांगता 'लागा चुनरी में डाग' ह्या भैरवीने झाली. यानंतर सुग्रास जेवणाची मेजवानी होती. निघताना मन आणि पोट तृप्त होऊन सर्वांची मनोवस्था 'आनंद पोटात माझ्या माईना, माईना...' अशी झाली होती. ही ऊर्जा घेऊन पुढच्या वर्षीची पंचायत पेठांची पालखी वाहायला सर्वजण सज्ज झाले.

# 'बँक ठेवींना विमा सुरक्षा' मागणीला सार्वत्रिक पाठिंबा

**- ॲड. शिरीष वा. देशपांडे, कार्याध्यक्ष**

बँक ठेवीदारांच्या संपूर्ण ठेवी 100% विमा संरक्षित करा' ही मागणी आपल्या संस्थेने लावून धरली आहे. आपण याबाबत अर्थमंत्र्यांना निवेदन सादर केले आहे. 'नवशक्ती'ने यावर मध्यंतरी 'संपादकीय' प्रसिध्द केले. सर्व स्तरांतून या मागणीला पाठिंबा मिळत आहे. याबाबतचा सविस्तर लेख तुम्ही गेल्या महिन्याच्या मासिकात वाचला असेल.

गेल्या आठवड्यात मुंबई ग्राहक पंचायतीच्या ठाणे येथील वार्षिक मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून खासदार नरेश म्हस्के आले असता संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांनी न्यू इंडिया बँक ठेवीदारांच्या समस्येकडे त्यांचे लक्ष वेधून हा प्रश्न संसदेत उपस्थित करण्याची विनंती केली होती. ३ एप्रिल रोजी लोकसभेत खासदार नरेश म्हस्के यांनी या विषयावर केंद्र सरकारचे लक्ष वेधून बँकांच्या संपूर्ण ठेवी 100% विमा सुरक्षित असाव्यात अशी आग्रही मागणी केली. त्याचबरोबर डीआयसीजीसी ही सरकारी ठेव विमा कंपनी बँकांकडून संपूर्ण रकमांवर प्रीमियम वसूल करत असून बँक बुडल्यावर ठेविदारांना फक्त पाच लाख रुपये परत करते, हे अयोग्य आणि आक्षेपार्ह असून याबाबत संबंधित कायद्यात त्वरित दुरुस्ती करण्यात यावी, अशीही मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी केली. भाजप खासदार तेजस्वी सूर्या यांनी २६ मार्च रोजी लोकसभेत शून्य प्रहरात बँकेतील ठेवींवरील पाच लाख पर्यंतच्या विमा संरक्षित रकमेत वाढ करण्याची मागणी केली. तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या बँक ठेवींना १०० टक्के विमा संरक्षणाची मागणी करत यासाठी DICGC कायद्यात दुरुस्ती करण्याची मागणी केली. सध्या 35A अंतर्गत अडकलेल्या सर्व बँकांमधील ठेवीदारांना या दुरुस्तींचा लाभ देण्यात यावा, अशीही मागणी यावेळी तेजस्वी सूर्या यांनी केली.

या मागणीचे स्वागत असून मा. अर्थमंत्री या मागण्यांचा गंभीरपणे विचार करतील अशीही आशा मुंबई ग्राहक पंचायतीने व्यक्त केली आहे. बँक ठेवींवरील विमा रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन आहेच. त्यावर आता लवकरात लवकर निर्णय घ्यावा आणि सर्वच ठेवीदारांच्या संपूर्ण ठेवी विमा सुरक्षित कराव्यात आणि त्याचा लाभ न्यू इंडिया सहकारी बँक आणि सिटी सहकारी बँकेच्या सर्वच ठेवीदारांना देण्यात यावा, अशी मागणी आपल्या संस्थेने अर्थमंत्र्यांकडे केली आहे.

‘बँकिंग’ बद्दल बोलूया

# ऑनलाईन पेमेंटची मर्यादा निश्चित करा!

- अभय दातार

आर्थिक फसवणुकीमुळे नुकसान होण्याचे प्रमाण वाढत आहे. या प्रकारे होणाऱ्या फसवणुकीची मुख्य साधने दोन– एक म्हणजे लालूच आणि दुसरे म्हणजे भीती. जास्ती परताव्याचे आमिष, भव्यदिव्य बक्षिसे, लॉटरी, इत्यादी पहिल्या प्रकारात मोडतात; तर वीज कापणे, डेबिट कार्ड किंवा खाते ब्लॉक करणे, डिजिटल अटक, या धमक्या दुसऱ्या प्रकारात मोडतात. सायबर भामटे हे दोन्ही प्रकार सराईतपणे वापरतात आणि आपल्या खात्यातले पैसे हातोहात लंपास करतात. आपल्या मोबाईलवर आलेला ओटीपी, आपला युजर आयडी, आपला पासवर्ड शेअर करू नका, तुमची बँक या गोष्टी तुमच्याकडे मागत नाही वगैरे वारंवार दिले जाणारे इशारे बऱ्याचदा कुचकामी ठरतात आणि आपला मोह, आपली भीती यामुळे आपण पैसे गमावून बसतो. या दोन्ही प्रकारात आपण घ्यायची, काळजी म्हणजे आपले डोके शांत ठेवायचे आणि कोणतीही कार्यवाही तातडीने करायची नाही. त्याशिवाय आणखी एक राजमार्ग म्हणजे ‘मर्यादा’ राखणे.

अनेकजण आर्थिक व्यवहार ऑनलाईन तसेच डिजिटल पध्दतीने करतात. त्यासाठी इंटरनेट बँकिंग, मोबाईल ॲप, डेबिट / क्रेडीट कार्डस्, जीपे सारखे युपीआय वगैरेंचा वापर करतात. जेव्हा आपण नव्याने ही साधने वापरायला सुरुवात करतो, तेव्हा बँका व्यवहारांच्या रकमांवर काही ठराविक (Default) बंधने घालतात. एका व्यवहाराची रक्कम, एका दिवसाची एकूण रक्कम, एका दिवसातील व्यवहारांची एकूण संख्या, एखाद्या विशिष्ट व्यक्तीला पैसे पाठवायचे असतील तर तिची वारंवारता आणि मर्यादा असे अनेक प्रकार आहेत. आपल्या गरजा लक्षात घेऊन आपण बँकेने घातलेली ही ठराविक बंधने कमी-जास्ती करू शकतो. आपण वापरत असलेले नेट बँकिंग किंवा मोबाईल ॲप याद्वारे आपण या मर्यादा निश्चित करू शकतो. याचा फायदा असा की




आपल्याला फसवून कोणी पैसे काढू पहात असेल, तर आपले संभाव्य नुकसान जास्तीत जास्त या मर्यादेपर्यंतच असते, त्यापेक्षा अधिक नुकसान होणार नाही. ही मर्यादा तुम्ही तुमच्या डेबिट / क्रेडीट कार्डसाठीही ठरवू शकता.

या व्यतिरिक्त काही बँकांनी तुम्हाला तुमचे इंटरनेट बँकिंग किंवा ॲपद्वारे करायचे व्यवहार विशिष्ट वेळेत करता येणार नाहीत अशीही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सर्वसाधारणपणे आपण बहुतेक व्यवहार दिवसा करतो. त्यामुळे व्यवहार न करण्याची वेळ समजा रात्री १० ते सकाळी ८ ठेवली, तर त्या वेळेत कोणतेही व्यवहार करता येणार नाहीत. ही वेळ सोयीची नाही म्हणून तुम्हाला बदलायची असेल, तर ती रात्री १० च्या आधी किंवा सकाळी ८ च्या नंतरच बदलता येईल. या वेळेत ती बदलायचा प्रयत्न केलात तर तुमची बँक तुम्हाला लॉगइन करूच देणार नाही.

यावरून आपल्या लक्षात येईल की आपली सुरक्षितता जपण्यासाठी बँका सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. आवश्यकता आहे ती आपणही थोडी काळजी घेण्याची आणि कोणत्याही मोहाला, भीतीला बळी न पडण्याची.

वाचकहो, हे करून पाहिले का?

- तुमच्या घरी कामाला येणाऱ्यांना प्राथमिक बचत खात्याची माहिती देणे.
- कुटुंबातील एखाद्या अज्ञान व्यक्तीच्या नावे खाते उघडणे.
- खात्यातून रोख रक्कम काढण्यासाठी एटीएमचा वापर करणे.

वाचू आनंदे

## भन्नाट शोध

**लेखक:** अच्युत गोडबोले आणि अमृता देशपांडे
**कृष्णा पब्लिकेशन्स**
**मूल्य:** ₹३००/- **वाटपातील किंमत:** ₹१६८/-




रोजचं जगणं सोपं आणि सुखकारक करणाऱ्या, आपल्या दिनचर्येचा अविभाज्य भाग असलेल्या अनेक लहान मोठ्या वस्तू, यंत्रे आपण गृहीत धरून चालतो. टूथब्रश, पादत्राण/बूट, लिफ्ट अशा अनेक उपयुक्त वस्तू कशा घडल्या, त्या शोधांचा धांडोळा घेऊन, त्यांचे काळाच्या पटलावर सापडलेले ठसे ओळखून, ती माहिती हे पुस्तक आपल्यासमोर ठेवते. रस्ते या पहिल्या प्रकरणापासून सुरू झालेला हा वाचन प्रवास आपल्याला सुईपासून शिवणयंत्रापर्यंत, चुलीपासून ओव्हन मार्गे रेफ्रिजरेटर पर्यंत, टपाल तिकीटापासून रिमोट कंट्रोल पर्यंत अनेक वस्तूंबाबत छोट्या टिपण सदृश लेखांमधून सखोल माहितीने समृद्ध करतो.

हजारो वर्षांपासून वापरल्या गेलेल्या, माणसाच्या प्रगतीनुसार बदलत गेलेल्या वस्तूंच्या शोधांबाबत कधी काही गाळलेल्या जागा राहतात. त्या विषयी समर्पक विवेचन या पुस्तकात दिलेले आहे.

'आपण खातो ते रिंग डोनट पूर्वी नव्हते. पूर्वी होते, कणकेचे तळलेले गोळे. ती कणिक वॉलनटच्या आकाराची असायची, म्हणून या पदार्थाला डो-नट म्हणतात,' अशी वेगळीच माहिती या पदार्थाबद्दल दिली आहे. एकूण ६० टिपणे असलेले हे पुस्तक कुठूनही उघडून वाचावे आणि विश्वसनीय माहिती मिळवावी. विविध शोधांमागे माणसाने फार पूर्वीच्या कालापासून केलेल्या कल्पना आणि प्रयत्न यांचा रंजक इतिहास आहे.

**- वसुंधरा देवधर**

## सहयोगी सभासदांना कळकळीचे आवाहन

संस्थेच्या सर्व विद्यमान सहयोगी सभासदांनी वार्षिक रु. २४०/- शुल्क भरून सभासदत्वाचे नूतनीकरण करावे. नूतनीकरण करण्याची शेवटची तारीख **३० जून २०२५** ही आहे.

संस्थेच्या वाटप व्यवस्थेमध्ये सहभागी होणे शक्य नसेल तर, सहयोगी सभासदत्व घेऊन संस्थेशी निगडित राहा. त्यामुळे ग्राहक चळवळीशी तुम्ही कायम जोडलेले राहाल.

## श्रद्धांजली



दादर-माहिम-बांद्रा विभागाच्या माजी समिती सदस्य सुखदा पालकर यांचे शनिवार, ८ मार्च रोजी दुःखद निधन झाले. त्या २०१८ सालापर्यंत विभाग समितीवर कार्यरत होत्या. तसेच त्यांनी संस्थेच्या खरेदी समितीवरही बरीच वर्षे मोलाचे योगदान दिले आहे.



दादर-माहिम-बांद्रा विभागाच्या माजी समिती सदस्य प्रमिला मार्डिकर यांचे सोमवार, २१ मार्च रोजी दुःखद निधन झाले. या २००८ सालापर्यंत विभाग समितीवर कार्यरत होत्या. संस्थेच्या शिक्षण विभागातही त्यांनी बालग्राहकांसाठी ग्राहक-जागृतीचे कार्य केले होते.

# वार्षिक मेळावे उत्साहात संपन्न

## मालाड विभाग

मालाड विभागाचा २७ वा वार्षिक मेळावा शनिवार, १८ जानेवारी रोजी ब्राह्मण सभा येथे संपन्न झाला. मेळाव्याचे प्रमुख पाहुणे प्रा. हेमंत सामंत आणि अध्यक्ष शुभदा चौकर होत्या. चित्रा जोशी आणि संगीता स्वार यांच्या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्याध्यक्ष भाग्यश्री सामंत यांनी प्रास्ताविक भाषण केले. कार्यवाह चित्रा जोशी यांनी अहवाल वाचन केले आणि प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. अध्यक्षांची ओळख स्वाती नातू यांनी करून दिली.

प्रा. हेमंत सामंत यांनी मोबाईल वापरताना ईमेल अ‍ॅड्रेसमध्ये आपल्या नावाचा, आडनावाचा उल्लेख नसावा, पासवर्ड सारखा बदलत रहावा, रस्त्यावर मिळणारी सिमकार्ड घेऊ नयेत, पब्लिक ठिकाणचे फ्री वायफाय वापरू नये, बँकेचा कस्टमर केअर नंबर गुगलला विचारू नये, बाहेरगावी फिरायला गेल्यावर हॉटेलातील स्मार्ट टी.व्ही.चे कनेक्शन चालू ठेऊ नये, असे महत्त्वाचे मुद्दे सांगितले.

अध्यक्षा शुभदा चौकर यांनीही सोशल मिडियाचा वापर अविचाराने केल्यास आणि चंगळवादी वृत्तीने ऑनलाईन शॉपिंग व डिलिव्हरी यांचा वापर केल्यास काही गोष्टी कशा अंगलट येतात, त्याचे दाखले दिले. जागरूक व जबाबदार ग्राहक म्हणून आपण ऑनलाईन व्यवहार करताना कोणती काळजी घ्यावी, हेही त्यांनी सांगितले.

पौराणिक काळापासून ते आधुनिक काळातील अनुल्लेखित स्त्रियांची मनोगते सांगणारा कार्यक्रम 'तुम्हाला म्हणून सांगते' फार छान झाला. त्यात रामदासांची पत्नी, टिळकांची पत्नी, भानुमती, आवली, कुंती, मंदोदरी, डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या मनोगतांचे अभिवाचन सुरेखा प्रधान, वैशाली जोशी, अलका परळकर आणि नीलिमा मुळगावकर यांनी केले. सर्वांचे आभार उमा पावनगडकर यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती करंदीकर यांनी केले. अरविंद स्वार, कविता टिकम, खजिनदार शानबाग यांनी कार्यक्रमाच्या अन्य जबाबदाऱ्या सांभाळल्या. मालाड विभागातील सुमारे १०० सभासद उपस्थित होते. सर्वांना तिळगूळ, अल्पोपहार आणि भेटवस्तू म्हणून ज्यूट बॅग देण्यात आल्या.

**- चित्रा जोशी**

## ठाणे विभाग

मुंबई ग्राहक पंचायत ठाणे विभागाचा वार्षिक मेळावा १९ जानेवारी रोजी संपन्न झाला.

अमोला किणी हिच्या सुमधुर गणेश वंदन गायनाने मेळाव्याची सुरुवात झाली. ठाणे विभागाने सन २०२४-२५ या वर्षात राबवलेल्या उपक्रमांचे आणि कार्यक्रमांचे अहवाल वाचन अंजली बापट यांनी केले. दहावी आणि बारावीच्या तसेच पदवी परीक्षेत




**मालाड विभागाच्या वार्षिक मेळाव्यात प्रमुख पाहुणे प्रो. हेमंत सामंत मार्गदर्शन करताना.**




**ठाणे मेळाव्यात उपस्थित कार्यकर्ते**

विशेष प्राविण्य मिळविलेल्या ग्राहक संघ कुटुंबातील विद्यार्थ्यांचा गौरव मॅजेस्टिक बुक डेपोची कूपन्स देऊन करण्यात आला. पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धेतील विजेत्यांनाही पुस्तकांसाठी कूपन्स आणि प्रशस्तीपत्रके देऊन गौरवण्यात आले.

प्रमुख पाहुण्या प्रियांका सावंत यांनी मार्गदर्शन करताना सांगितले, ‘विचार, भावना आणि वर्तन’ ह्या तीन बाबी व्यक्तिमत्त्व सुंदर आणि समतोल बनण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. आपल्या विचारांनुसार भावना निर्माण होऊन वर्तन घडते. योग्य भावनांमुळे प्रतिकारशक्ती वाढून मानसिक, शारीरिक आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते. AI मुळे होणाऱ्या बदलांचा सामना करायचा असेल तर योग्य भावभावना विकसित करून माणूस म्हणून वैचारिक गोष्टी वाढवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यश स्थिर नसतं, अपयशही स्थिर नसतं. परिवर्तन, बदल ही एकमेव स्थायी गोष्ट आहे. अनेक उदाहरणे देऊन त्यांनी मार्गदर्शन केले. ते सर्वांनाच उद्बोधक असे होते.

संस्थेचे कार्योपाध्यक्ष प्रभाकर गवाणे यांनी मार्गदर्शन करताना आपली संस्था फक्त वाणसामान वितरण करत नाही, तर ग्राहकांच्या निगडित वेगवेगळ्या समस्यांवर कशी काम करत असते, हे सांगितले. ‘ग्राहकांच्या बँक ठेवींवर विमा संरक्षण हवे’ या अर्थमंत्र्यांकडे केलेल्या मागणी संदर्भात त्यांनी माहिती दिली.

त्यानंतर दीप्ती कुलकर्णी यांनी ‘छंद आनंद’ हा मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केला.

पाहुण्यांचे स्वागत हिरा अकोलकर, ओळख नीला लुमण, अरुंधती रानडे यांनी तर आभार प्रदर्शन स्नेहल नाडकर्णी, सूत्रसंचालन वर्षा भुर्के यांनी केले.

**- वर्षा भुर्के, कार्यवाह, ठाणे विभाग**

## ➤ पालघर विभाग - रौप्य महोत्सवी मेळावा

पालघर विभागाचा रौप्य महोत्सव माहीम भुवनेश कीर्तने विद्यालयाच्या सभागृहात १९ जानेवारी रोजी मोठ्या दिमाखदारपणे पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून रजनी वेलणकर (सुप्रसिध्द नाट्य, चित्रपट अभिनेत्री) उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शुभदा चौकर यांनी भूषविले.

मधुरा जोशी हिने ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. पालघर विभागाच्या कार्याध्यक्षा सुनंदा तोडणकर यांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी पालघर विभाग स्थापनेआधीपासून मुंबईहून होणाऱ्या सामानाची वाहतूक व वितरण तसेच विभागस्थापनेपासून ते आजच्या रौप्य महोत्सवापर्यंतच्या विभागाच्या दमदार वाटचालीचा आणि कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीचा सविस्तर आढावा घेतला. पालघर विभाग राबवित असलेल्या वैविध्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. विभागाच्या २५ वर्षांच्या दमदार आणि देदिप्यमान वाटचालीचा आलेख दाखवणाऱ्या हस्तलिखित स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हस्तलिखितांमध्ये संस्थेच्या ज्येष्ठ व विभागातील कार्यकर्त्यांची मनोगते असून विभागात आजवर झालेल्या उपक्रमांचे फोटो रूपात संकलन करण्यात आले आहे.

विभागाच्या २५ वर्षांच्या वाटचालीचा कार्यवृत्त अहवाल विभागाच्या कार्यवाह वैशाली राऊत यांनी सादर केला. विभाग स्थापनेपासून ते आजवरच्या विभागाच्या वाटचालीत सक्रियपणे सहभागी असलेल्या विभागाच्या आजी, माजी पदाधिकारी कार्यकारिणी सदस्य, विभाग- वितरण कार्यकारिणी सदस्य,




**पाहुण्यांसोबत पालघरची कार्यकारीणी**

वितरण केंद्रातील कर्मचारी यांचा त्यांनी आजवर दिलेल्या योगदानाबद्दल सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यकर्त्यांचा सन्मान का होतो आहे हे सांगून कार्यकर्त्यांची ओळख विजय सावे यांनी करून दिली.

विभागाच्या शिबिरे, बाल ग्राहक संस्कार शिबिरे, कार्यशाळा, निवासी शिबिरे, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे, वार्षिक मेळावे, व्याख्याने सारख्या कार्यक्रमांना सर्वोतोपरी सहकार्य करणाऱ्या विभागातील विविध संस्थांचा सन्मान करण्यात आला. संस्थांचे आजवरचे विभागाच्या वाटचालीतील योगदान विजय सावे यांनी अधोरेखित केले.

प्रमुख अतिथी रजनी वेलणकर यांनी आपल्या संवादाने श्रोत्यांना जिंकून घेतले. अध्ययनातला 'अ' आणि अभिनयातला 'अ' हा विषय नवी दृष्टी, नवा विचार देऊन गेला. मुलांना शिक्षणात रस, गोडी वाटावी म्हणून पुस्तकातील पाठांचे नाट्य रूपांतर करून शिकविल्यास मुले लवकर ग्रहण करतात हे उदाहरणांसह त्यांनी सांगितले. 'नारायण ठोसर यांची बायको'च्या सादरीकरणाने त्यांनी सर्वांना भावविवश केले.
आज सामोऱ्या येणाऱ्या आव्हानांबद्दल, विशेषतः AI मुळे ज्या संकटांचा सामना करावा लागेल त्याबद्दलची जाणीव आणि जागृती शुभदाताईंच्या मनोगताने सहज शब्दांत तरीही जोरकसपणे केली. AI च्या दुष्परिणामाबद्दल तरुण पिढीला आतापासूनच मार्गदर्शनाची कशी आवश्यकता आहे, हेही त्यांनी उत्तमरित्या मांडले.

दुपारच्या सुग्रास भोजनाने आनंदात भर घातली. मनोरंजनासह माहितीपूर्ण अशा या कार्यक्रमांच्या आयोजनात सहभागी झालेल्या पालघर विभागाच्या सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन उपस्थितांनी केले आणि त्यांच्या प्रयत्नांना दाद दिली.

दुपारच्या दुसऱ्या सत्रात विभागाचा सन २०२४-२०२५ च्या वार्षिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून चित्रा वाघ (सुप्रसिध्द लेखिका, मुलाखतकार, सूत्रसंचालक) उपस्थित होत्या. तर अध्यक्षस्थान ज्योती मोडक (कार्यवाह, मुंबई ग्राहक पंचायत) यांनी भूषविले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक विभागाच्या कार्याध्यक्षा सुनंदा तोडणकर यांनी केले. त्यांनी पालघर विभागाच्या वर्षभरातील उपलब्धी आणि उपक्रमांचा आढावा घेतला.

विभागाच्या कार्यवाह वैशाली राऊत यांनी विभागाचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक कार्यवृत्त अहवाल सादर केला. वैशाली राऊत यांना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या चित्रा वाघ यांच्या हस्ते सन २०२४-२०२५ च्या उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वैशाली राऊत या गेली १४ वर्षे पालघर विभागात कार्यरत आहेत. संस्थेच्या आणि विभागाच्या अनेक उपक्रमांत त्या पुढाकार घेत असतात.

विभागातील सभासदांच्या पाल्यांचा त्यांनी शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, कृषी व इतर क्षेत्रात मिळविलेल्या धवल यशाबद्दल, गुलाबपुष्प, सन्मानपत्र व पुस्तक भेट देऊन मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. या गुणगौरवातील कु. विधिश जयेश राऊत हा योगा क्षेत्रात कार्यरत असून तालुका, जिल्हा, देश पातळीवर त्याने अनेक स्पर्धांमध्ये पदकांची लयलूट केली आहे. नुकत्याच कोईमतूर येथे पार पडलेल्या देशपातळीवरील योग स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना त्याने कास्य पदकाची कमाई केली आहे.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी चित्रा वाघ यांनी आपली मनोगतात जळगाव येथील 'दीपस्तंभ' या संस्थेविषयी माहिती दिली. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या दिव्यांग मुलं-




**इ-स्मरणिकेचे प्रकाशन पाहुण्यांच्या शुभहस्ते**

मुलींना येथे राहायला देऊन स्पर्धा परीक्षेसाठी तयार केलं जाते. त्या संस्थेला भेट देऊन त्या मुलांसोबत त्या राहिल्या आणि त्यांचे जीवन जवळून पहिले आणि 'मनोबल - तिमिरातुनी तेजाकडे' या पुस्तकाची निर्मिती झाली. त्यातील पांडुरंग राठोड यांच्या मुलाचा एक लेख त्यांनी वाचून दाखवला. हा अनुभव अंगावर रोमांच आणि काटा आणणारा होता. दिव्यांग मुलांना योग्य मार्गदर्शन केलं तर ते कशी गरुडझेप घेऊ शकतात, याचे मूर्तिमंत उदाहरण त्यांनी पेश केलं.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा ज्योती मोडक यांनी विभागाच्या कामाचं कौतुक करताना दोन्ही कार्यक्रमाच्या आखीव रेखीव आणि सुंदर नियोजनाबद्दल सर्वांना धन्यवाद दिले. सर्वांचे आभार विनय पाटील सर यांनी मानले. दोन्ही सत्रातील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुसूदन जोशी आणि विजय सावे यांनी मोजक्या शब्दांत केले.

**कार्यक्रम आयोजनातील काही ठळक वैशिष्ट्ये:**

- पिण्याच्या पाण्याच्या बाटलीचा पुन्हा पुन्हा वापर करणेसाठी लावलेला फलक
- नारळाच्या खाखोट्या पासून बनवलेला पेपरवेट
- सुंदर सजावट, अप्रतिम रांगोळ्या, पुष्परचना
- मोठ्या फळ्यावर लिहिलेली कार्यक्रम पत्रिका

कार्यक्रम यशस्वी करणेसाठी सर्व कार्यकर्त्यांच्या मोठ्या टीमने खूप मेहनत घेतली.

**- विजय सावे**

## कांदिवली विभाग

कांदिवली विभागाचा मेळावा ९ फेब्रुवारी रोजी पार पडला. सुमारे १२५ सदस्य उपस्थित होते. मेळाव्यासाठी शुभदा चौकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षा तर ॲड. उदय वारुंजीकर हे प्रमुख वक्ते आणि शशांक चौकीदार हे विशेष अतिथी म्हणून लाभले होते.

स्वाती परब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून ईशस्तवन व 'सहकार आमुचा प्राण' हे कवी मोहन सामंत यांनी लिहिलेलं आणि सोमनाथ परब यांनी संगीतबध्द केलेलं गीतही सादर केलं. कांदिवली विभागाचे कार्याध्यक्ष विजय वगळ यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. कार्यवाह स्मिता पोतनीस यांनी वार्षिक अहवाल सादर केला.

शशांक चौकीदार यांनी सांगितले की, चारकोप विभागात साधारण २७० सहकारी संस्था आहेत. प्रयत्न केल्यास आपण केवळ चारकोपमध्ये कितीतरी ग्राहक संघ सुरू करू शकू. इमारतीचा पुनर्विकास याबाबत सामान्य माणसांना बरीच कमी माहिती असते. त्यासाठीच ॲड. उदय वारुंजीकर यांनी दिलेली माहिती मोलाची होती. इमारत पुनर्विकासासाठी घ्यायची की नाही हे ठरवताना त्याचं स्ट्रक्चरल ऑडीट करून घेणं सगळ्यांसाठी योग्य असतं, हे त्यांनी विशद केले. बिल्डरबरोबर करार करताना कोणत्या प्रकारच्या अटी असायला हव्यात याबद्दल माहिती दिली.

पुनर्विकास बिल्डरकडून करून घेण्यापेक्षा स्वयंपुनर्विकास अधिक लाभदायक असतो. पण, त्यासाठी काय काय गोष्टी करायला लागतात, याविषयीही माहिती त्यांनी सांगितली. त्यानंतर पुनर्विकासासंबंधी आलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी सविस्तर उत्तरे दिली.




**व्यासपीठावर स्मिता पोतनीस, शुभदा चौकर, ॲड. उदय वारुंजीकर, शशिकांत चौकीदार आणि विजय वगळ**

शुभदा चौकर यांनी मुंबई ग्राहक पंचायतीकडून फक्त सामान मिळतं असं नाही तर आपोआप समाजशीलतेचे संस्कार होतात, हे सांगताना त्यांच्या लहानपणच्या आठवणी सांगितल्या. कांदिवली हे त्यांचे माहेर आणि त्यांच्या माहेरच्या संघाला ४७ वर्षं झाली, या आठवणी त्यांनी जागवल्या. आपल्यातल्या प्रत्येकाने ग्राहक संघ व सभासद वाढीसाठी प्रयत्न करणे कसे गरजेचे आहे, असे आवाहन त्यांनी केले.

वासुदेव वझे यांचा खास सत्कार करण्यात आला, त्यांच्या अथक प्रयत्नामुळे बेस्टची २७९ क्रमांकाची कांदिवली पूर्व-पश्चिम जोडणारी बससेवा सुरू झाली.

त्यानंतर सगळ्यांच्या मनोरंजनासाठी 'गा रे मना गा' हा श्रीसिध्दी विनायक अमृतवेल निर्मित गाण्यांचा कार्यक्रम प्रदीप विचारे यांच्या ग्रुपने सादर केला. त्यात कांदिवली विभागातील ज्योत्स्ना घुर्ये आणि समीर जोशी यांनीही गाणी म्हणून कार्यक्रमात आणखी बहार आणली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋता कोचरेकर यांनी केले आणि नीना पाटील यांनी सगळ्यांचे आभार मानले. विभागाचे कार्याध्यक्ष विजय वगळ, कार्यवाह स्मिता पोतनीस, समन्वयक ऋता कोचरेकर आणि कार्यकारिणी सदस्य सीमा रेळे, नीना पाटील, स्वाती परब, सुनीता कांबळे या सगळ्यांनी तसेच कांदिवली विभागातील अभिमानश्री संघ यांनी सगळ्यांनी मिळून मेळावा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रयत्न केले.

**- स्मिता पोतनीस, कार्यवाह,**
**कांदिवली विभाग**

## गोरेगाव विभाग

गोरेगाव विभागाचा ३३ वा वार्षिक मेळावा २३ फेब्रुवारीला संपन्न झाला. निवेदिता महाजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वल्लभ म्हापसेकर यांनी 'गजानना श्री गणराया' हे गाणे सुरेल सादर करून कार्यक्रमाची मधुर सुरुवात करून दिली.

प्रमुख पाहुणे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे, कार्योपाध्यक्ष अनुराधा देशपांडे व प्रभाकर गवाणे सर, संस्थेचे विश्वस्त संजीव मंत्री सर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. बुध्दीची देवता सरस्वतीचे चिन्ह असलेले सुरेख स्वागतचिन्ह देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

ज्योती बागवे यांनी 'अच्युतम् केशवम् कृष्ण दामोदरम्' या गाण्याचे सादरीकरण करून वातावरण भक्तिमय केले. यंदाच्या मेळाव्याची थीम होती 'सभासदांचे विविध गुणदर्शन'. चेतना संघाच्या गीता परूळेकर, नीला वालावलकर, अनिता पाध्ये, वीणा गद्रे यांनी छोटेसे नाटुकले सादर केले- 'आम्हीच ग्राहक सम्राज्ञी'. या नाटुकलीने ग्राहक पंचायतीच्या सर्वच पैलूंचे उत्तम दर्शन घडवून दिले. ही नाटुकली सुनीता ओक यांनी लिहिली होती. अनंताय संघाच्या अमोघ केणी यांचे किशोर कुमार यांच्या आवाजातले द्वंद्व गीत उत्तम झाले. अन्वी गोडबोले (प्रार्थना ग्राहक संघ) या १२ वर्षांच्या मुलीने कथ्थक-नृत्याविष्कार केला. बिंबीसार संघाच्या विद्या पाटील यांनी 'सांज ये गोकुळी' हे गाणे सादर केले.

अ. भि. गोरेगावकरच्या राही, आयुष आणि त्यांचे सहकारी विद्यार्थी यांनी नेहा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली बसवलेले नाटक अगदी आत्मविश्वासाने सादर केले. वल्लभ म्हापसेकरांचे पहाडी रागातले सुश्राव्य बासुरी वादन फारच छान! तसेच प्रार्थना संघाच्या मंगल गांगुर्डे यांचे 'केतकीच्या बनी' पण छान झाले. अमोघ केणी यांनी 'शूर आम्ही सरदार' हे स्फूर्तीगीत सादर केले.

पराग रेडकर आणि नेहा जोशी ह्यांनी उपस्थित सभासदांमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात आपली वितरण व्यवस्था व सजग ग्राहक यावर आधारित प्रश्नमंजुषा असा खेळ घेतला. सर्व प्रश्न आपल्या संस्थेशी निगडीत होते. यातून अनेक नवीन गोष्टींची माहिती सभासदांना झाली. आपल्या संघाच्या नंबरात काय काय गुपितं आहेत, हे मनिषा मोडक यांनी छान समजावले.




**कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांच्या पंचाहत्तरीनिमित्त गोरेगाव विभागातर्फे मानपत्र**

देशपांडे सर गेली ४० वर्ष आपल्या संस्थेशी जोडलेले आहेत. ‘MGP-इंडिया’ला त्यांनी ‘ब्रँडनेम’ बनविले. त्यांच्या वयाची ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. देशपांडे सरांच्या मानपत्राचे वाचन वसुंधराताईंनी केले. अतिशय मोजक्या पण चपखल शब्दांत त्यांनी सरांचे कौतुक केले. देशपांडे सरांनी त्यांच्या भाषणात साळवी सरांचे कौतुक केले. विभाग कसा बांधायचा, सगळ्यांना सामावून कसे घ्यायचे, सतत नवीन कल्पना आणून त्यांचा पाठपुरावा करायचा, आग्रही व्हायचे पण दुराग्रही नाही, या साळवी सरांच्या गुणांचे त्यांनी कौतुक केले.

ते पुढे म्हणाले की, ग्राहक संघ म्हणजे केवळ वाणसामान वितरण करणे नव्हे, तर ही ग्राहक चळवळ आहे. या ग्राहक




**अ.भि. गोरेगावकर शाळेतील ग्राहक मंडळाच्या विद्यार्थ्यांतर्फे 'जाहिरातींचा भूलभुलैया' हे नाटक सादर**

संघटनातून आपले प्रश्न पुढे नेणे व विचार, कल्पनांचे आदानप्रदान करणे आहे. सरकारच्या कुठल्याही अनुदाना शिवाय आपण ही स्वयंसेवी संस्था गेली ५० वर्षे यशस्वीरित्या चालवत आहोत. चंगळवादावर आळा घालण्याचा मुद्दा जागतिक स्तरावर चर्चेला येण्याआधीपासून MGP च्या पायाभूत विचारसरणीचा भाग आहे. न्यू इंडिया बँकेचा विषय अतिशय गंभीर आहे आणि तो MGP नी हाती घेतला आहे, असेही ते पुढे म्हणाले. आपल्या बँकेतील ठेवी सुरक्षित असल्याच पाहीजेत, यासाठी संस्थेने हाती घेतलेल्या मोहिमेची माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाची सांगता आणि आभार प्रदर्शन नेहा जोशी यांनी अलंकारिक शब्दांत केले.

**- स्वप्ना कुलकर्णी**

## ➤ वसई-नालासोपारा विभाग

वसई नालासोपारा विभागाचा वार्षिक मेळावा ९ मार्च रोजी संपन्न झाला. ह्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील मेळाव्यात सुवर्ण (सोनचाफा) चाफ्याचा सुगंध सभागृहामध्ये दरवळला होता. ९० सभासदांची उपस्थिती मेळाव्यात होती.

विभागीय अध्यक्षा व वसईतील सुप्रसिध्द ज्येष्ठ लेखिका वीणाताई गवाणकर, मेळाव्याच्या अध्यक्षा रंजना मंत्री (संघटन विभाग प्रमुख) व प्रमुख पाहुणे मा. प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत) यांनी दीपप्रज्वलन व गणेश पूजन केले. वसई विभागाच्या कार्याध्यक्षा मेघना कुलकर्णी, वसई वितरण विभाग प्रमुख प्रकाश पाटील व कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या कीर्ती शेंडे उपस्थित होत्या. मीना घरत यांनी सुरेल ईशस्तवन सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्षा मेघनाताई कुलकर्णी यांनी केले. २०२४-२५ या वर्षभराच्या कार्यकाळात विभागाने केलेल्या विविध कार्यक्रमांचा (बाल ग्राहक शिबिर, विभागीय वाटपे व स्पर्धा) आढावा त्यांनी घेतला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभाकर गवाणे सर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. मुंबई ग्राहक पंचायत सुवर्ण वर्ष साजरे करीत आहे याबद्दल गवाणे सरांनी अधिक माहिती उपस्थितांना दिली. ग्राहक संघाचे यश हे विविध संघप्रमुख व कार्यकर्त्यांचे आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. मुंबई ग्राहक पंचायतीच्या वितरण व्यवस्थेचे जिन्हिवाच्या सभेत कौतुक झाले याची त्यांनी आठवण करून दिली. मुंबई ग्राहक पंचायतचे मासिक नियमित वाचून ग्राहक म्हणून सक्षम व सजग राहण्याचा सल्ला त्यांनी दिला. ग्राहक चळवळ पुढे नेण्यासाठी, नवीन कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी संपर्क, संवाद, संघटन या त्रिसूत्रींवर काम करण्याचा मंत्र त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या कीर्ती शेंडे यांनी 'पर्यावरण जनजागृती' या विषयावर आधारित दैनंदिन वापरातील प्लास्टिक व त्यापासून होणारे प्रदूषण याबद्दल उपस्थितांना माहिती दिली. तसेच दररोजच्या वापरातील प्लास्टिकचा वापर कसा टाळता येईल किंवा कमी करता येईल, याबद्दल त्यांनी काही क्लुप्त्या उपस्थितांना सांगितल्या. त्यांनी स्थापन केलेल्या 'ध्यास फाउंडेशन' या संस्थेबद्दल अधिक माहिती दिली.

ज्या विविध स्पर्धा विभागातर्फे घेण्यात आल्या होत्या, त्यातील यशस्वी सभासदांना बक्षीसे देण्यात आली. विभागाच्या उपक्रमात जास्तीत जास्त सहभागी होऊन उपक्रम यशस्वी केल्याबद्दल दत्तगुरु संघाला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. वितरण केंद्रातील कर्मचाऱ्यांचे ऋणनिर्देश करण्यासाठी प्रकाश पाटील (वितरण केंद्र सचिव) यांचे प्रमुख पाहुणे गवाणे सर यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन कौतुक करण्यात आले. बक्षीस समारंभाचे सूत्रसंचालन स्वप्ना राऊत यांनी केले.




**वसई विभागीय कमिटी**




**मेळाव्याच्या अध्यक्षा संघटन प्रमुख रंजना मंत्री यांचे स्वागत करताना वसई विभाग कार्याध्यक्षा मेघना कुलकर्णी**

कार्यक्रमाच्या अध्यक्षा रंजना मंत्री यांनी मेळाव्याला उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात मेळाव्याचे कौतुक केले. ग्राहक चळवळीसाठी वेळ द्या, वेळ काढा, असे त्यांनी आवाहन केले. बक्षीस समारंभासाठी कागदी वेस्टन वापरल्याबद्दल व चहा कॉफीसाठी कागदी किंवा युज अँड थ्रो कप न देता स्टीलच्या भांड्यांचा वापर केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. सुहास अभ्यंकर यांनी सर्वांचे आभार मानले.

यावर्षी आपल्या सभासदांना 'एक दिवस स्वतःसाठी' असे आवाहन केल्यामुळे सभासदांमध्ये वेगळाच उत्साह होता. १३ सभासदांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. पेटी वाजवणे, कविता वाचन, अनुभव कथन, कथाकथन, संस्कृत कोडी व हिंदी गाणी असे विविधरंगी कार्यक्रम सादर झाले. मुंबई ग्राहक पंचायत वर सादर केलेली कविता सगळ्यांनाच आवडली. खरोखरच सर्व सभासदांनी मेळाव्याच्या आनंद लुटला. कार्यक्रम सादर करणाऱ्या प्रत्येक सभासदाला भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती म्हात्रे यांनी केले, तर पूर्वार्धाचे सूत्रसंचालन महेश अभ्यंकर यांनी केले. अरुणा बापट व प्रवदा कोलते यांनीही आयोजनात मदत केली.

**- तृप्ती मि. म्हात्रे, कार्यवाह, वसई नालासोपारा विभाग**

जागेअभावी काही विभागीय मेळाव्यांचे वृत्तान्त पुढील अंकात घेत आहोत.

# लॉलिपॉपची गोष्ट

- अंजली पोतदार



संजनाची लाडकी तीन वर्षांची नात रुही एका मैत्रिणीच्या वाढदिवसाला जाऊन आली. तिथे मिळालेलं लॉलीपॉप तिला इतकं आवडलं की दुसऱ्या दिवशीपासून रुहीने संजनाच्या मागे शिट्टीवाल्या लॉलीपॉपसाठी लकडाच लावला. आता आज्जीला काही माहीत नव्हतं की हे लॉलीपॉप कुठे मिळतं, कोणत्या कंपनीचं आहे ते. पण बालहट्टापुढे तिचं काही चालेना. तिने जवळपासची एक-दोन दुकान शोधली. पण शिट्टीवालं लॉलीपॉप काही मिळेना. खरंतर रुहीला गोळ्यांतील रंगांची ॲलर्जी होती, पण या लॉलीपॉपने तिला काहीही त्रास झाला नव्हता. त्यामुळे संजना बाजारातल्या नेहमीच्या खाऊच्या दुकानात गेली. तिथे मात्र तिला हवं तसं शिट्टीवालं लॉलीपॉप मिळालं. तिने लगेच त्यावरचं नाव, कंपनीचं नाव, घटक पदार्थ वाचले. विदेशी कंपनी होती. साखर, सायट्रिक ॲसिड, बीट रूटचा अर्क एवढेच घटक पदार्थ होते. संजना खुश झाली. मिळताहेत तर आल्यासारखे ४-५ लोलीपॉप घेऊ म्हणून संजनाने २२५/- रुपयांची ५ लॉलीपॉप घेतली. संजना खुशीत घरी पोहोचली. रुही तर लॉलीपॉप बघून नाचायलाच लागली.

एक लॉलीपॉप उघडून रुही त्याची शिट्टी वाजवायला गेली तर काय? शीट्टीच वाजेना. नीट बघितलं तर त्याला वरती जे एक छिद्र असतं ते नव्हतंच. दोघी अगदी खट्टू झाल्या. संजनाने लगेच दुसरं लॉलीपॉप उघडून रुहीला दिले. त्याचीही तीच कथा. शेवटी “तू नुसतं गोड गोड लॉलीपॉप खा. मी उद्या तुला शिट्टीवालं आणेन हं” अशी नातीची समजूत घातली संजनाने. मुलगा लगेच आईला म्हणाला, “आई अगं, एवढसं लॉलीपॉप, ते काय बदलून आणायचं? जाऊदे.” पण आई पडली ग्राहक पंचायतीची सभासद. “अरे एवढसं असलं तरी ४५ रुपयांना एक आहे ते. मी ती शोधून निवडून आणलीयेत. मग मला माझ्या पैशांचा योग्य मोबदला मिळत नसेल तर तक्रार करण्याचा आणि ती निवारण करून घेण्याचा हक्क मला आहेच ना? उद्याच जाते त्या दुकानात.”

दुसऱ्या दिवशी संजना मुद्दामच संध्याकाळच्या वेळेत दुकानात गेली. उरलेली तीन न उघडलेली आणि उघडलेलं एक लॉलीपॉप दुकानदाराला दाखवून तिने तिची तक्रार सांगितली. दुकानदार म्हणाला, “असं होऊ शकतं. आम्ही काही ती लॉलीपॉप उघडून बघून वाजतात की नाही ते नाही बघत.” मग मात्र संजनाने थोडा आवाज चढवून ती तीन लॉलीपॉप बदलून देण्याचा आग्रह धरला. त्या बदल्यात १३५ रुपयांचा दुसरा खाऊ दुकानदाराने चुपचाप दिला. मुलाला ही गोष्ट फोनवर सांगताच मुलाने "आई तू नाही सुधारणार" असा शेरा दिला.

ही गोष्ट सांगण्याचा उद्देश म्हणजे आता सुट्टीत बऱ्याच जणांची नातवंडं आजी-आजोबांकडे येतील. किंवा आजी-आजोबा, काका, मामा, मावश्या एकत्र भेटतील. मग मुलांचा खाऊ म्हणजे गोळ्या, चॉकलेट्स, केक अशा खाद्यपदार्थांची खरेदी जोरात असते. काही देशी, तर काही परदेशी गोळ्या, चॉकलेट्स आपण खरेदी करतो. किंमत काही जास्त नसते. त्यामुळे घेताना फार खबरदारी घेतली जात नाही, तर आज जरा त्याविषयीची माहिती बघूया.

गोळ्या म्हटल्या की लिम्लेटच्या, बडीशेपच्या, रावळगाव टॉफीस, पार्लेच्या केशरी, पिवळ्या अशा अनेक गोळ्या आठवतात. आणि चॉकलेट म्हटलं की कॅडबरी, हर्षीस, किटकॅट, मंच अशी नावं आठवतात. मग गोळ्या आणि चॉकलेट यामध्ये मुख्य फरक काय बरं? तर गोळ्यांमध्ये साखर हा मुख्य घटक असतो तर चॉकलेटमध्ये कोको हा मुख्य घटक असतो. इजिप्त देशात सुमारे ३००० वर्षांपासून गोळ्यांचा उल्लेख आढळतो. सुरुवातीला साखरेऐवजी मधापासून गोळ्या बनवल्या जात. विविध फळं, सुका मेवा, दालचिनी, वेलची असे मसाल्याचे पदार्थ, विविध हर्ब्स यांचा वापर यांत होई. नंतर पर्शियन काळात मधाच्या ऐवजी साखरेचा वापर सुरू झाला. त्याहीनंतर मका, मेपल सिरप यांपासून निर्मित साखरेचा वापर सुरू झाला. सायट्रिक ॲसिड, जिलेटीन, अंड्यातील अल्बुमिन यांचाही वापर गोळ्यांमध्ये होतो. गोळ्यांमध्ये क्रिस्टलाइन कँडी आणि नॉन क्रिस्टलाइन कँडी असे दोन प्रकार येतात. क्रिस्टलाइन कँडी कडक असतात, तर नॉन क्रिस्टलाइन कँडी मऊ असतात. काहींमध्ये दुधाचाही वापर होतो.

चॉकलेटमध्ये मात्र प्रामुख्याने कोकोचा वापर होतो. डार्क चॉकलेटमध्ये कमीतकमी ७०% कोको पावडर असली पाहिजे. साखरेचं प्रमाण यांत खूपच कमी असतं. दुधाचा वापर यांत जास्त होतो. चॉकलेट हे कर्बोदकांचे उत्तम स्रोत आहे. पटकन ऊर्जा मिळण्यासाठी यांचा उपयोग होतो. थोड्या प्रमाणात यांत कॅफेन आणि थेओब्रोमिन असते. म्हणून खूप प्रमाणात खाऊ नये.

### गोळ्या, चॉकलेट विकत घेताना काय काळजी घ्यावी?

- ✓ घटक पदार्थ बघून घ्या.
- ✓ **शेल्फ लाईफ-** म्हणजे वापरण्यास योग्य कालावधी हे बघणे अतिशय महत्त्वाचे कारण हल्ली अनेक प्रकारची विदेशी चॉकलेट्स उपलब्ध असतात. ती आयात केल्यानंतर किती काळ खाण्यायोग्य राहतात ते बघणं आवश्यक आहे. कारण हा नाशवंत खाद्यपदार्थ आहे. ठराविक मुदतीनंतर खाल्ल्यास आरोग्याला अपाय होऊ शकतो. इंपोर्टेड गोष्टी सगळ्या चांगल्या, ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे.
- ✓ उत्पादकाचे, आयातदाराचे, वितरकाचे नाव, पत्ता, ई-मेल पत्ता, फोन हे ही असणे आवश्यक आहे.
- ✓ किंमत
- ✓ वजन (नेट वेट)
- ✓ ही सर्व माहिती वेष्टनावर हिंदी किंवा इंग्रजी भाषेत असलीच पाहिजे, पण छोट्या गोळ्यांवर ही माहिती लिहिणे शक्य नसते, म्हणून छोट्या गोळ्यांचे मोठे पाकीट घ्यावे, ज्यावर ही माहिती लिहिणे बंधनकारक आहे.

## Massive Haul of Fake Paneer



Consumers who enjoy fresh paneer, beware! The Food and Drug Administration (FDA) in Ahmedabad has recently busted a major operation, seizing a staggering 1500 kilograms of adulterated paneer from a dairy.

Investigations revealed that this fake paneer was manufactured using palm oil and acetic acid, a substance typically used for industrial purposes. The demand for paneer often outstrips the supply in the market. This creates an opportunity for unscrupulous producers to adulterate paneer for profit. This fake, adulterated paneer poses significant health risks to consumers.

**Protect Yourself from Fake Paneer:**

Genuine paneer is primarily made of milk solids (proteins and fats). It should not contain starch.

Some common adulterants used in fake paneer, such as potato starch or other forms of starch, are added to mimic the texture and bulk of real paneer, often at a lower cost. Iodine solution reacts with starch, producing a characteristi blue or black colour. You can usually find tincture of iodine (a diluted iodine solution) at most pharmacies. Take a small piece or a mashed sample of the paneer you want to test (about a teaspoonful). Add 2-3 drops of iodine solution onto the paneer sample. Wait for a minute or two and observe if there is any colour change.

If No Colour Change (or a very faint yellowish-brown colour, which is the natural colour of iodine): This suggests the paneer is likely free from added starch and is more likely to be genuine.

If the paneer sample turns blue or black, it indicates the presence of starch, suggesting that the paneer may be adulterated with potato starch or other starch-based fillers.

Paneer adulterated with palm oil might appear excessively smooth, shiny, and even rubbery to the touch. Fake paneer made with palm oil might lack characteristic aroma or have a

slightly oily or even artificial smell. Real paneer has a mild, milky taste. Adulterated paneer might taste bland, slightly oily, or even have a hint of artificial flavour. When you try to mash real paneer with your fingers, it should crumble easily. Paneer with a significant amount of palm oil might hold its shape more firmly and feel less crumbly. Fake paneer with palm oil might melt unevenly, become very oily, or even retain its shape without browning.

If the paneer is being sold at a significantly lower price than the usual market rate for good-quality paneer, it could be a red flag. Palm oil is often used as a cheaper alternative.



## Is Your Watermelon Safe?

Summer is here, and so are juicy watermelons! But before you bite into that seemingly perfect red slice, the Food Safety and Standards Authority of India (FSSAI) is urging consumers to be vigilant about potential adulteration. Here's what you need to know to ensure your refreshing treat is safe:

**FSSAI Sounds the Alarm on Watermelon Adulteration:**

- The FSSAI has issued guidelines and warnings concerning the adulteration of watermelons with artificial colours, particularly erythrosine (a red dye).
- These artificial colours are used to enhance the appearance of the watermelon, making it look more appealing than it naturally is.

**Simple Tests You Can Do at Home:**

- **The Cotton Ball Test:**

1. Rub a cotton ball gently over the red pulp of the watermelon.
2. **Warning Sign**: If the cotton ball turns noticeably red, it suggests the presence of artificial colouring, possibly erythrosine.

- **The Water Test:**

1. Place a few slices of watermelon in a bowl of water.
2. **Warning Sign:** If the water quickly turns red, it's another strong indication of artificial dye.

- Avoid Suspicious Watermelons: Be wary of watermelons that appear to have an excessively uniform size, shape and intensely vibrant, almost artificial-looking red colour. These could be artificially ripened or coloured.
- **Wash Thoroughly:** Always wash the entire watermelon under running water before cutting it.
- **Peel if Possible:** If you can, remove the peel entirely before consuming the fruit. This can help reduce exposure to any surface contaminants.
- **Be Aware of Potential Allergens:** Watermelons might contain artificial food colourings like Fast red and Erythrosine, which can trigger allergic reactions in some individuals.

Stay informed and stay safe this summer. By being aware and conducting these simple tests, you can protect yourself and your family from the harmful effects of adulterated watermelons.

# मुंबई ग्राहक पंचायतची अभिमानास्पद वास्तू

# ग्राहकभवन

संस्थेच्या प्रत्येक सदस्याला अभिमान स्थान असलेले आपले 'ग्राहक भवन' म्हणजे १९८६ साली संस्थेच्या सदस्यांनी स्वबळावर उभी केलेली, ग्राहक चळवळीचे प्रेरणास्थान असलेली भारतातील स्वयंसेवी ग्राहक संस्थेची स्वतःची वास्तू! ह्या वास्तूचे हुबेहुब प्रारूप संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त घडवले घडवले गेले. त्याचे शिल्पकार आहेत **श्री. राजेंद्र येवलेकर**. हे पेशाने आर्टिस्ट असून पुणे येथील B.N.C.A. कॉलेजमध्ये कार्यशाळा प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. सिंहगड कॉलेज, डी.वाय. पाटील कॉलेज, एस.बी.पाटील कॉलेज येथेही ते प्रशिक्षक आहेत. ग्राहक भवनचे मॉडेल घडवायला त्यांना सहा महिने लागले. संस्थेच्या या अभिमानास्पद वास्तूचे कायमस्वरूपी प्रारूप ग्राहक भवन येथे सर्वांना बघण्यासाठी उपलब्ध आहे.



• POSTAL REGISTRATION NO. MCN/158/2023-2025 • WPP LICENSE NO. MR/TECH/WPP-137/NORTH/2023-2025
• LICENSE TO POST WITHOUT PREPAYMENT, ON 5TH & 6TH • VILE PARLE (W) P.O. MUMBAI - 400 056
RNI NO. MAHBIL/2011/39044

# संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्यात पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले कार्यकर्ते



कृतज्ञता पुरस्कार–ललिता कुलकर्णी



कृतज्ञता पुरस्कार–अशोक रावत



कृतज्ञता पुरस्कार–कमळाकर पेंडसे



उत्तम वितरण केंद्र प्रमुख–प्रभाकर गवाणे



उत्तम भौगोलिक विभाग प्रमुख–राजेंद्र राणे




पंचायत पेठ–विशेष पुरस्कार–अनुराधा देशपांडे



उत्तम आर्थिक नियोजन–विशेष पुरस्कार रविंद्र सहस्रबुद्धे




उत्तम स्तंभलेखन आणि ग्राहक प्रबोधन – शर्मिला रानडे